वाचा :- १. संचालनालयाचे परिपत्रक क्र. स्था. १८/ब/सन २००७-०८ /लेप ३/ पंराज/ १६९४, दि. २७.११.२००८.
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ३६, दि. ३०.७.२००९
३. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १२, दि. १५.०९.२०१५
४. संचालनालयाचे स्थायी आदेश क्र. ०७/२०१७, दि. १८.०४.२०१७

स्था.१८/ब/ अहवाल शाखा /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य,
कोंकण भवन, ६ वा मजला,
नवी मुंबई -४०० ६१४

स्थायी आदेश क्र.९४/२०१७, दिनांक 12 SEP 2017

विषय:- जिल्हा परिषद / पंचायत समिती / नगरपालिका /नगरपालिका शिक्षण मंडळ / नगरपंचायत यांच्या लेखापरीक्षणाबाबत करावयाच्या कामकाजाबाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचा मधील आदेशांमध्ये जिल्हा परिषद / पंचायत समिती /नगर पालिका / नगर पालिका शिक्षण मंडळ /नगरपंचायत यांच्या लेखापरीक्षणासाठी पथक प्रमुख व लेखापरीक्षणाचे संनियंत्रण व अहवालाचे अंतिमीकरणाबाबतचे प्राधिकारी निश्चित करण्यात आले आहेत.

तथापि विभागनिहाय व जिल्हानिहाय कामकाजाचे अवलोकन केले असता याबाबत एक वाक्यता आढळून येत नाही. सक्षम प्राधिकाऱ्याला कार्यालयीन कामकाजामुळे अहवाल वाचनास (Memo Reading) वेळ उपलब्ध न झाल्यामुळे अहवालांचे अंतिमीकरणाबाबतचे व निर्गमन यात विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे. यास्तव स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणासंदर्भात पुढील प्रमाणे पुरक आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश:-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणाचे अनुषंगाने लेखापरीक्षणाची कार्यपध्दती व कार्यकक्षा खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

अ. क्र.	स्थानिक स्वराज्य संस्था	प्राधिकृत अधिकारी / कर्मचारी					
		पंचायत समिती	जिल्हा परिषद (९ विभाग)	जिल्हा परिषद (४ विभाग)	नगरपालिका / शि.मंडळ अ वर्ग	नगरपालिका / शि.मंडळ ब वर्ग	नगरपालिका / शि.मंडळ क वर्ग / नगरपंचायत
१	पथक प्रमुख	वलेप/सलेपअ / लेखापरीक्षा अधिकारी	सलेपअ / लेखापरीक्षा अधिकारी	सहाय्यक संचालक	लेखापरिक्षा अधिकारी	सलेपअ / लेखापरीक्षा अधिकारी	सलेपअ
२	पुनर्विलोकन	लेखापरीक्षा अधिकारी	लेखापरीक्षा अधिकारी	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	लेखापरीक्षा अधिकारी	लेखापरीक्षा अधिकारी
३	अहवाल वाचन	सहाय्यक संचालक	लेखापरीक्षा अधिकारी	सहसंचालक/ सहा.संचालक	सहाय्यक संचालक	लेखापरीक्षा अधिकारी	लेखापरीक्षा अधिकारी
४	अंतिमीकरण	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	सहसंचालक	सहसंचालक	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक
५	अहवाल निर्गमन	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक	सहाय्यक संचालक